नियमित वाचा....
दैनिक / साप्ताहिक

गौरव महाराष्ट्राचा

संपादक संपर्क - 9423442056 | ONLINE EXCLUSIVE

गावठी पिस्तूल अन् ६ जिवंत काडतुसे घेऊन फिरणारा पोलिसांच्या जाळ्यात!

स्थानिक गुन्हे शाखेची कळमनुरीत कारवाई; 68 हजारांचा मुद्देमाल जप्त, मध्य प्रदेशातील व्यक्तीकडून शस्त्र खरेदी केल्याची संशयिताची माहिती

कळमनुरी | प्रतिनिधी

हिंगोली जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कारवाईची मोहीम तीव्र केली असून, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कळमनुरी परिसरात कारवाई करत गावठी बनावटीचे पिस्तूल आणि 6 जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या एका इसमाला ताब्यात घेतले आहे. या कारवाईत पिस्तूल, काडतुसे आणि मोटारसायकल असा एकूण 68 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या सूचनेनुसार कारवाई

पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांनी जिल्ह्यात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक वसंत आरसेवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

एकूण 68 हजारांचा मुद्देमाल जप्त

विनोद खरवडे याच्याकडून एक गावठी पिस्तूल, 6 जिवंत काडतुसे आणि अंदाजे 40 हजार रुपये किमतीची मोटारसायकल असा 68 हजार रुपयांचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला आहे.

कारवाईत सहभागी पथकाचे कौतुक

ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक वसंत आरसेवार तसेच पोलीस हवालदार लिंबाजी वाहुळे, गजानन पोकळे, रवीकुमार स्वामी, पांडुरंग राठोड, निरंजन नलवार, सतीश जाधव, नरेंद्र साळवे आणि दत्ता नागरे यांनी केली आहे.

मोरवाडीतील विनोद खरवडे ताब्यात!

दरम्यान, गोपनीय बातमीदारामार्फत विनोद मोतीराम खरवडे (रा. मोरवाडी, ता. कळमनुरी, जि. हिंगोली) हा लमांनदेव मंदिराजवळ मोटारसायकलवर थांबला असून, त्याच्याकडे गावठी पिस्तूल व जिवंत काडतुसे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

पोलिसांनी संबंधित ठिकाणी सापळा रचून विनोद खरवडे याला ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यातील पिस्तूल (अग्निशस्त्र) अंदाजे 25 हजार रुपये किमतीचे आणि पिस्तूलाच्या मॅगझीनमध्ये 6 जिवंत काडतुसे आढळून आली. तसेच त्याच्या ताब्यातील मोटारसायकलही जप्त केली.

या प्रकरणी विनोद खरवडे आणि शिवम रझा या दोघांविरुद्ध कळमनुरी पोलीस ठाण्यात भा.श.अ. कलम 3/25 तसेच भा.न्या.सं. कलम 3(5) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

कलमवीर

गावठी पिस्तूल व सहा जिवंत काडतुसांसह एकास अटक

मध्य प्रदेशातून शस्त्र खरेदी केल्याची कबुली; हिंगोली स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

हिंगोली दैनिक कलमवीर ब्युरो

जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्याविरुद्ध पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू केला असून, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कळमनुरी येथे गावठी पिस्तूल व सहा जिवंत काडतुसासह विनोद मोतीराम खरवडे (रा. मोरवाडी, ता. कळमनुरी) यास ताब्यात घेतले.पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक वसंत आरसेवार यांच्या पथकाने ही कारवाई केली. कळमनुरी शहरातील लमानदेव मंदिरासमोरून इदिरानगरकडे जाणाऱ्या रस्त्यालगत हनुमान मंदिराजवळ एक इसम गावठी पिस्तूल बाळगून असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सापळा रचून संशयितास ताब्यात घेण्यात आले.



त्याच्याकडून अंदाजे २५ हजार रुपये किमतीचे गावठी पिस्तूल, तीन हजार रुपये किमतीची सहा जिवंत काडतुसे आणि ४० हजार रुपये किमतीची मोटारसायकल, असा एकूण ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीत सदर पिस्तूल व काडतुसे मध्य प्रदेशातील दतिया जिल्ह्यातील शिवम रझा याच्याकडून विकत घेतल्याचे त्याने सांगितले.या प्रकरणी विनोद खरवडे व शिवम रझा या दोघांविरुद्ध कळमनुरी पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ तसेच भारतीय न्याय संहिता कलम ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील सहायक पोलीस निरीक्षक वसंत आरसेवार यांच्यासह पोलीस हवालदार लिंबाजी वाहुळे, गजानन पोकळे, रवीकुमार स्वामी, पांडुरंग राठोड, निरंजन नलवार, सतीश जाधव, नरेंद्र साळवे व दत्ता नागरे यांनी केली.

देशोन्नती

अवैध गावठी पिस्तुल व जिवंत काडतुसे बाळगणाऱ्यास जेरबंद

स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन...

हिंगोली : अवैधरित्या गावठी पिस्तुल व जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या इसमास स्थानिक गुन्हे शाखा हिंगोलीच्या पथकाने जेरबंद केले असून त्याच्याकडून ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांनी जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक वसंत आरसेवार यांचे पथक कळमनुरी पोलीस ठाणे हद्दीत माहिती घेत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली ज्यामध्ये विनोद मोतीराम खरवडे, रा. मोरवाडी, ता. कळमनुरी हा इसम कळमनुरी हद्दीतील लमानदेवा समोरून इंदिरानगरकडे जाणाऱ्या रोडच्या बाजूला असलेल्या हनुमान मंदिराजवळ मोटारसायकलवर गावठी पिस्तुल व जिवंत काडतुसे बाळगून आहे.

माहिती मिळताच पोलीस पथकाने सापळा रचून विनोद खरवडे यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक गावठी बनावटीचे पिस्तुल अंदाजे किंमत २५ हजार रुपये,



पिस्तुलच्या मॅगझीनमधील ६ जिवंत काडतुसे किंमत ३ हजार रुपये व त्याच्या ताब्यातील मोटारसायकल किंमत ४० हजार रुपये असा एकूण ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

चौकशी दरम्यान त्याने सदरचे पिस्तुल व जिवंत काडतुसे शिवम रझा, रा. शेवडा, जि. दतिया, राज्य मध्यप्रदेश याच्याकडून विकत आणल्याचे सांगितले. यावरून दोन्ही आरोपींविरुद्ध पोलीस ठाणे कळमनुरी येथे भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ सह कलम ३(५) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक कमलेश मीना, पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक वसंत आरसेवार, पोलीस हवालदार लिंबाजी वाहुळे, गजानन पोकळे, रविकुमार स्वामी, पांडुरंग राठोड, निरंजन नलवार, सतीश जाधव, नरेंद्र साळवे, दत्ता नागरे सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा हिंगोली यांनी केली आहे.

Hingoli Edition
Nov 04, 2026 Page No. 1
Powered by: erelego.com

दैनिक शब्दराज
epaper.shabdraj.com
04NOV2026

हिंगोलीत गावठी पिस्तूल आणि 6 जिवंत काडतुसांसह एकाला अटक; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

शब्दराज मीडिया :-
कळमनुरी प्रतिनिधी

कळमनुरी : हिंगोली जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कारवाई करत गावठी पिस्तूल आणि सहा जिवंत काडतुसांसह एका इसमाला ताब्यात घेतले. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मंगळवारी (दि. ३ नोव्हेंबर) कळमनुरी येथे केली.



पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांनी जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक वसंत आरसेवार यांच्या पथकाने कळमनुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुप्त माहितीच्या आधारे शोधमोहीम सुरू केली.यावेळी विनोद मोतीराम खरवडे (रा. मोरवाडी, ता. कळमनुरी, जि. हिंगोली) हा लमानदेव मंदिरासमोरून इंदिरानगरकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या हनुमान मंदिराजवळ मोटारसायकलवर गावठी पिस्तूल व जिवंत काडतुसे घेऊन असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी घटनास्थळी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.झडतीदरम्यान त्याच्याकडून अंदाजे २५ हजार रुपये किमतीचे गावठी बनावटीचे पिस्तूल, ३ हजार रुपये किमतीची सहा जिवंत काडतुसे आणि ४० हजार रुपये किमतीची मोटारसायकल असा एकूण ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांच्या चौकशीत संबंधित पिस्तूल आणि काडतुसे मध्य प्रदेशातील दतिया जिल्ह्यातील शेवडा येथील शिवम रझा याच्याकडून विकत आणल्याचे विनोद खरवडे याने सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.या प्रकरणी विनोद खरवडे आणि शिवम रझा या दोघांविरुद्ध कळमनुरी पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ तसेच भारतीय न्याय संहिता कलम ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

.ही कारवाई पोलीस अधीक्षक कमलेश मीना आणि पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक वसंत आरसेवार तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील पोलीस कर्मचारी लिंबाजी वाहुळे, गजानन पोकळे, रवीकुमार स्वामी, पांडुरंग राठोड, निरंजन नलवार, सतीश जाधव, नरेंद्र साळवे आणि दत्ता नागरे यांनी केली.

TheHitavada
Vidarbha Line | 2026-11-04 | Page- 2
ehitavada.com

Man arrested with country-made pistol, six live cartridges



Police team along with the accused.

■ **Our Correspondent**
HINGOLI, Nov 3

THE Hingoli Local Crime Branch arrested a man for allegedly carrying an illegal country-made pistol and six live cartridges near a Hanuman temple in Kalamnuri on Tuesday, said police. The arrested man has been identified as Vinod Motiram Kharwade, a Indiranagar and caught him.

During a search, the police seized a country-made pistol worth around Rs 25,000 and six live cartridges valued at Rs3,000. His motorcycle, worth Rs 40,000, was also seized. The total value of the seized property is estimated at Rs 68,000. During questioning, Kharwade allegedly told the police that he had purchased

पुण्य नगरी

अवैध गावठी पिस्तूल बाळगणाऱ्यास केले जेरबंद



हिंगोली / प्रतिनिधी

स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेने मंगळवारी (दि.३) गावठी अवैध पिस्तूल बाळगणाऱ्या एकाला अटक केली असून त्याच्यासोबत असलेले जिवंत काडतुसे देखील जप्त केले आहेत.

पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांनी जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द कार्यवाही करणे बाबत सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने मोहन भोसले पोलीस निरीक्षक स्थागुशा यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि वसंत आरसेवार यांचे पथक हे कळमनुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या इसमाबाबत माहिती काढत होते. त्यावेळी मिळालेल्या गोपनीय माहिती आधारे विनोद मोतीराम खरवडे रा. मोरवाडी ता. कळमनुरी जि. हिंगोली हा कळमनुरी हद्दीतील लमान देवाचे समोरून इंदीरानगरकडे जाणाऱ्या रोडचा बाजुस हनुमान मंदिराजवळ त्याच्या जवळील मोटारसायकलवर असल्याचे कळाले. पोलीस पथकाने माहिती ठिकाणी सापळा रचून विनोद मोतीराम खरवडे यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे एक गावठी बनावटीचे पिस्तूल (अग्नीशस्त्र) किंमत अंदाजे २५ हजार रुपये व पिस्तुलच्या मॅगझीनमध्ये ३ हजार रुपयांची ६ जिवंत काडतुस व त्याच्या ताब्यात असलेले मोटारसायकल असा एकूण ६८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अधिक चौकशी केली असता त्याने सदरचे पिस्तूल व जिवंत काडतुस हे शिवम रझा रा. शेवडा जि. दतीया मध्यप्रदेश याच्याकडून विकत आणल्याचे सांगितले आहे. यावरून दोन आरोपीतांविरूध्द कळमनुरी पोलीस ठाण्यात भा.ह.का. कलम ३/२५ सहकलम ३(५) भा. न्या. संहीता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक कमलेश मीना, पोलीस निरीक्षक मोहन भोसले, हिंगोली यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक वसंत आरसेवार, पोलीस हवालदार लिंबाजी वाहूळे, गजानन पोकळे, रवीकुमार स्वामी, पांडुरंग राठोड, निरंजन नलवार, सतीश जाधव, नरेंद्र साळवे, दत्ता नागरे सर्व नेमणूक स्था.गु. शा. हिंगोली यांनी केली आहे.